GRT
Golden Research Thoughts
ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

दहशतवाद

प्रा.मल्लिनाथ अंजुनगीकर
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील , महिला महाविद्यालय,सोलापूर.

प्रस्तावना

दहशतवाद किंवा जागतिक दहशतवाद हा नवीन विषय नाही. दशहतवाद सर्वच राष्ट्रांमध्ये मोठया प्रमाणात पसरलेला असून भारतातील दहशतवाद हा तर मोठया चिंतेचा विषय बनला आहे. काही विचारवंतांच्या मते दहशतवाद हा युध्दाचाच एक प्रकार आहे. त्या दृष्टीने विचार केल्यास दशहतवादाचा आढळ प्राचीन काळापासून असलेला दिसतो. प्राचीन भारतीय राजनीतीमध्ये कपटयुध्दांची, युरोपमधील काही क्रांत्यांमध्ये आणि आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिकेतील अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये दहशतवादी मार्गाचा मोठा अवलंब करण्यात आलेला दिसतो.

आधुनिक काळात दहशतवाद किंवा जागतिक दहशतवाद ही संज्ञा सर्वप्रथम १७८९ मध्ये घडून आलेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमधून उदयास आली. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या जॅकोबिन्सनी राजाला पदच्युत करून त्याचा अमानुष वध केला. तसेच स्वातंत्र्य आणि समतेच्या नावाखाली असंख्य निरपराध लोकांना क्रूरपणे ठार मारले आणि काही काळ फ्रान्समध्ये दहशत निर्माण केली. प्रसिध्द विचारवंत एडमंड बर्क यांनी जॅकोबिन्सचा 'दहशतवादी' असा उल्लेख

केला आहे. पुढे राज्यविरूध्द हिंसात्मक पध्दतीने लढणाऱ्या क्रांतिकारकांचा उल्लेख करण्यासाठीही हा शब्द वापरण्यात येऊ लागला.

मात्र 'हिंसेचे सत्वज्ञान' सर्वप्रथम १९ व्या शतकात मांडण्यात आले. अराज्यवादी विचारवंत मिखाईल बाकुनीन याने प्रथम कृतीचे प्रचार हे सूत्र मांडले. भीती आणि दहशतवाद निर्माण होईल अशी कृती करून सामाजिक प्रगती वा राज्यक्रांती सुध्दा घडवून आणावी असा त्या सूत्राचा अर्थ होता. विनाशाची वा विध्वंसाची आकांक्षासुध्दा एक रचनात्मक आकांक्षा असते असे त्याचे मत होते. त्याचा सहकारी निश्चेव्ह याने असे म्हटले की, आमचे कार्य जागतिक स्वरूपाचे असून ते भयानक, निर्दय आणि संपूर्ण संहार करणारे असे आहे.

विसाव्या शतकात जार्ज सोरेल आणि फ्रॅन्टज् फॅनान यांनी सुध्दा दहशतवाद हा पीडित वर्ग आणि जनता यांचा स्वांतत्र्य मिळविण्याचा मार्ग आहे असे मत मांडले आहेत. महत्वाचे म्हणजे अनेक संघ्ज्ञटना स्वतःला मार्क्सवादी लेनिनवादी म्हणवून घेतात. मात्र कार्लमार्क्स आणि लेनिन यांनी आपल्या विचारात कोठेही दहशतवादाचे समर्थन केलेले नाही. उलट मार्क्सने दहशतवादी कृत्यास अपरिपक्व आणि मूर्खपणाची कृती असे म्हटले आहे.

आज विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रचंड प्रगतीमुळे दहशतवादास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. मात्र दहशतवादाच्या व्याख्येसंदर्भात एक वाक्यता नाही. नुकतेच अमेरिकेवरील हल्ल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघटनेने जी बैठक आयोजित केलेली हाती, तेथेही व्याख्येवर एकमत होऊ शकलेले नाही. मात्र विविध विचारवंतांनी दहशतवादाच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील काही खालीलप्रमाणे होत -

१. प्रसिध्द राजकीय विचारवंत डॉ. मधुसूदन रेड्डी यांनी एका व्याख्यानात दहशतवादाची चर्चा करतान दहशतवाद म्हणजे विशिष्ट राजकीय उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी निरपराध लोकाविरूध्द केलेली हिंसात्मक कृती होय. असे म्हटले आहे.

२. बी.एन. जेनकिंस यांच्या मते, हिंसेची धमकी किंवा व्यक्तिगत दहशतीची कृती करून प्रामुख्याने दहशत निर्माण करण्याच्या दृष्टीने आखलेली योजना म्हणजे दहशतवाद होय.

३. पॉल विल्किन्सन यांच्या मते, राजकारणातील दहशतवाद म्हणजे धमकी, जबरदस्ती आणि बहुसंख्यांकांच्यावर आणि विरूध्द अल्पसंख्यांकाची इच्छा लादण्याचे एक शस्त्र होय.

४. स्कारझेन बर्गर यांच्या मते, दहशतवादी हा त्यांच्या पुढील उद्देशांच्या संदर्भात तत्काळ ओळखता येतो. त्याच्या मनात असलेला कोणताही उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने तो बळाचा वापर करून भीती निर्माण करतो.

5. डेव्हीड हाएस यांच्या मते, दहशतवाद म्हणजे एखाद्या लहान गटाकडून विशिष्ट राजकीय हेतू साध्य

करण्यासाठी, राज्यविरूध्द करण्यात आलेली संघटित हिंसात्मक कृती होय.

६. मराठी विश्वकोषानुसार, दहशतवाद खऱ्या अर्थाने वाद म्हणजे तत्वप्रणाली नाही, पण एका विशिष्ट तत्वप्रणालीतील एका पंथाने स्वीकारलेली आचारप्रणाली असे त्याचे वर्णन करता येईल. अराज्यवादाच्या एका शाखेचा तो कृतिशील आविष्कार आहे.
७. सामाजिक शास्त्र विश्वकोषानुसार दहशतवाद म्हणजे अशी पध्दती की, ज्यात संघटित गट वा पक्ष आपले निश्चित उद्दिष्ट, मुख्यतः हिंसेचा पध्दतशीर वापर करून साध्य करण्याचा प्रयत्न करतात.
८. ब्रिटिश विश्वकोषानुसार, एखाद्या राजकीय उद्दिष्टाकडे लक्ष वेधण्यासाठी एखाद्या व्यक्तिविरूध्द वा लोकांविरूध्द वा शासनाविरूध्द दहशतीचा पध्दतशीरपणे केलेला वापर किंवा हिंसेचा अकल्पनीय असा वापर म्हणजे दहशतवाद होय.

दहशतवादाच्या वरील व्याख्या पाहता काही गोष्टी स्पष्ट होतात ः

अ. दहशतवादी कृत्ये ही सुसंघटित असतात आणि त्यात जाणीवपूर्वक करण्यात आलेले नियोजन व मार्गदर्शन यांचा अंतर्भाव असतो.
ब. दहशतवादी कृत्ये ही एखाद्या लहान अर्थातच गुप्त अशा संघटनेच्या सशस्त्र स्त्री-पुरूषांच्या मार्फत पार पाडली जातात.
क. दहशतवादाचे बळी जरी सर्वसामान्य, निरपराध नागरिक असले तरी त्याचा मुख्य रोख राज्यव्यवस्था आणि त्यांच्या प्रतिनिधीकडे असतो.
ड. दहशतवादाचा मार्ग हा काही विशिष्ट राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याकरिता स्वीकारला जातो. त्यामागे केवळ गुन्हेगारी वृत्ती नसते.

आधुनिक दहशतवादाचा अभ्यास करीत असताना काही बाबी नजरेस येतात त्या म्हणजे,

१. दहशतवाद हा दुःख, विध्वंस आणि तिरस्कार या चक्राचा एक भाग असतो, कधी तो त्यांचे कारण बनतो तर कधी त्यांची प्रतिक्रिया.
२. दहशतवादाचे स्वरूप आंतरराष्ट्रीय असते.
३. दहशतवादाचे निश्चित असे उद्दिष्ट असते.
४. दहशतवादामध्ये शत्रू ओळखता येत नाही. कारण दहशतवादाद्यांच्या कारवाया मुख्यतः गुप्त स्वरूपाच्या असतात.
५. दहशतवादाचे लक्ष्य कुणीही असू शकते, दहशतवाद्यांच्या हल्ला एखाद्या व्यक्तीपासून विशाल जनसमुदायापर्यंत, कोणावरही, कोठेही, कोणत्याही क्षणी होऊ शकतो.
६. दहशतवाद हा हिंसा, क्रौर्य आणि विकृत मनोवृत्ती यांचा परिपाक असतो.
७. दहशतवाद हा युध्दाचाच एक प्रकार आहे आणि युध्द राजकारणाचाच एक भाग आहे.
८. दहशतवादात सनदशीर मार्गाला तीव्र विरोध असतो. सनदशीर मार्गाला पर्याय म्हणूनच दहशतवादाचा उदय होतो.
९. दहशतवादामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील प्रगतीचा मोठा वापर करून घेतला जातो.

दहशतवाद्यांचा अभ्यास करीत असताना असे दिसून येते की,

अ. यात तरूण वर्गाची संख्या मोठी आहे.
ब. यात बुध्दिवादी लोकांची संख्या मोठी आहे, शिक्षितांचा तसेच उच्च विद्याविभूषित लोकांचा सहभाग आहे.
क. यात महिलांचा सहभाग उल्लेखनीय असा आहे.
ङ दहशतवादी कुणीही असू शकतो, उदा. शिक्षक, शेतकरी, व्यापारी, कामगार इत्यादी

दहशतावाद्यांच्या कृत्यांचा, त्यांच्या क्रौर्याचा आणि त्यांच्या समर्पण वृत्तीचा विचार करता दहशतवादाचा मानसशास्त्रीय अभ्यास महत्वाचा ठरतो.

दहशतवादाची कारणमीमांसा करताना असे दिसून येते की, मुख्यतः आर्थिक आणि राजकीय समस्या या जहाल विचारांस कारणीभूत ठरतात. तसेच समाजातील असंतोष, धार्मिक, सामाजिक, वांशिक, भाषिक इत्यादी वाद दहशतवादास पोषक ठरतात. समाजातील आर्थिक विषमता, समुध्द आणि श्रीमंत गटाविषयीच्या तक्रारींना जागा देते आणि दहशतवादी संघटना प्रसिध्दी आणि पाठिंबा यासाठी त्यांचा वापर करून घेतात.

राज्यसत्तेकडून होणार सत्तेचा पाशवी वापर - अत्याचार, प्रस्थापितांची जुलूमशाही, केला जाणारा भेदभाव दहशतवादास कारणीभूत ठरतो. तसेच राष्ट्रवादाच्या भावेमुळे - मुख्यतः जे देश पारतंत्र्यात आहेत वा ज्या प्रदेशांना स्वतंत्र व्हावयाचे आहे, तेथील समुदायामध्ये राज्य व प्रस्थापितांकडून होणाऱ्या अन्यायाच्या विरोधातून दहशतवाद वाढीस लागतो.

तसेच धर्मवेडेपणाचे वस्त्रे पांघरून जोपासला जाणारा मूलतत्वावादीही दहशतवादाच्या प्रसारास आणि वाढीस कारणीभूत ठरतो. याव्यतिरिक्त शस्त्रास्त्र निर्माण करणाऱ्या कंपन्या, सोने-चांदी अंमलीपदार्थ यांच्या अवैध व्यवसायात असणाऱ्या व गुंतलेल्या लोकांकडून

स्वतःच्या फायद्यासाठी दहशतवादास खतपाणी घातले जात असल्याचे दिसते. याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक भाग म्हणून, कूटनीतीचा एक भाग म्हणून, शत्रू राष्ट्र वा प्रतिस्पर्धी राष्ट्रामध्ये पंचस्तंभी कारवाया घडवून आणल्या जातात.

दशहतवादाच्या विविध कारणांच्या अनुषंगाने दहशतवादाचे काही प्रकारही सांगितले जातात. उदा. वांशिक दहशतवाद, धार्मिक दहशतवाद, सांस्कृतिक दहशतवाद,मार्क्सवादी दहशतवाद, राजकीय दहशतवाद, राष्ट्रीय दहशतवाद इ.

दहशतवादावरील उपायांचा विचार करीत असताना एका महत्वाच्या मुद्याकडे लक्ष द्यावे लागते ते म्हणजे दहशतवादात शत्रू हा उघडरीत्या हल्ला करीत नाही. त्यामुळे शत्रू कोण आहे हे माहित नसते. या संदर्भात सुप्रसिध्द चिनी युध्दतज्ञ सून सू यांचे मत महत्वाचे वाटते. त्यांच्या मते, जर तुम्हाला शत्रूची ओळख असेल आणि आत्मज्ञान असेल तर १०० लढायांच्यासुध्दा परिणामांची काळजी करण्याचे कारण नाही. मात्र शत्रुबद्दल काहीच ज्ञान नसेल तर प्रत्येक युध्दात तुमचा दारूण पराभव होईल. हा युध्दशास्त्रातील मूलभूत नियम आहे. दुसरे म्हणजे केवळ कायदा आणि सुव्यवस्था यांच्या चौकटीत सोडविता येण्याइतपत मर्यादित हा विषय नाही. त्यामुळेच या प्रवृत्तीशी लढणे थोडसे कठीण आहे. यासाठी दहशतवादाला जन्म देणाऱ्या, प्रेरीत करणाऱ्या कारणांचा खोलवर विचार करून नवीन उपाय शोधणे आवश्यक ठरते.

या संदर्भात दहशतवादी नेमके कोणाला म्हणावयाचे हा सुध्दा महत्वाचा प्रश्न आहे. कारण संयुक्त राष्ट्रसंघाने जुलमी, लोकशाहीविरोधी व शोषण करणाऱ्या राजवटीविरूध्द लढण्याचा पीडित जनतेचा हक्क मान्य केला आहे. त्यामुळै दहशतवादी की स्वातंत्र्य योध्दा असा प्रश्न निर्माण होतो. हा ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनानुसार निश्चित होणारा विषय आहे. आजचे दहशतवादी उद्याचे स्वातंत्र्य सैनिक, देशभक्त, नव्हे राष्ट्रनिर्मातेही ठरू शकतात. इतिहासात याचे दाखले मिळतात. दहशतवादाला विरोध करण्यासाठी - त्याचे निर्मूलन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत वेळोवेळी परिषदा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. काही वेळा समित्या नेमून ठरावही मंजूर करण्यात आले आहेत. मात्र दहशतवाद संपुष्टात येऊ शकलेला नाही.

या पार्श्वभूमीवर दहशतवादाच्या उपयांची चर्चा होणे आवश्यक वाटते. दहशतवादाला तोंड देण्यासाठी खालील उपाय सांगता येतात-

१. बाह्य आक्रमणापासून रक्षण करणे आणि राज्यांतर्गत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे राज्याचे प्रथम कर्तव्य आहे. त्या दृष्टीने राज्याने आपली गुप्तचर यंत्रणा आणि संरक्षण व्यवस्था मजबूत ठेवली पाहिजे.
२. दहशतवादाच्या मूळाशी जाऊन, कारणांचा शोध घेऊन त्या दृष्टीने उपाय योजले पाहिजेत.
३. राजकीय दशहतवादास राजकीय उत्तर दिले पाहिजे.
४. सर्वसामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. तसेच शाळा, महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. दहशतवादविरोधी प्रशिक्षण दिले पाहिजे.
५. दहशतवादविरोधी लढयामध्ये जनतेच्या सहभागाची अत्यंत आवश्यकता असते. ग्रामरक्षक, मोहल्ला रक्षक अशी दले उभारली पाहिजेत. आदर्श मूल्यांचा प्रसार केला पाहिजे.
६. नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना वाढविली पाहिजे. आदर्श मूल्यांचा प्रसार केला पहिजे.
७. महत्वाचे म्हणजे आपले राजकीय नेतृत्व आणि प्रशासन स्वच्छ, पारदर्शी आणि कर्तव्यदक्ष असेच असले पाहिजे.
८. समाजात लोकशाही मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच आर्थिक समता आणि सामाजिक न्याय खऱ्या अर्थाने प्रस्थापित होईल या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे.

दहशतवाद हे आधुनिक व्यवस्थेपुढील मोठे आव्हान आहे. दहशतवादाच्या अलकडच्या घटना ह्या सुसंस्कृत समाजव्यवस्थेच्या दृष्टीने भयसूचक घंटानाद आहे. दहशतवादाचे प्रयोग आता आणखी विध्वंसक स्वरूपात सुरू होण्याची शक्यता आहे. कारण रासायनिक, जैविक आणि आण्विक शस्त्रांचा वापर दहशतवाद्यांनी केला तर ते फारचे नवलाचे ठरणार नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे केंद्रीभूत सेवा असलेल्या नवीन विकसित समाजाला दहशतवादाच्या नव्या समस्येला सामोरे जावे लागेल. तेव्हा विकसित समाजाला दहशतवादाच्या नव्या समस्येला सामोरे जावे लागेल. तेव्हा वरील सर्व उपायांचा वापर करून दहशतवाद रोखण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे आणि हे अशक्य नाही.

संदर्भ :

१. David Robertson, Dictionary of politics, Pengain Boods, England १९९३.
२. The New Encycloedia, Britanica, Micropedia, Volume, ११ Page no. ६५०
३. David Hayes, Terrorists and Freedom Fighters, Wayland Publishers ltd, England, १९८५.
४. I lavertsky, Ernesto Che Ghevara, Progress Publishers Moscow १९८५
५. Ram Ahuja, Social problems in India, Rawat Publications, Jaipur १९९२
६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, प्रमुख संपादक, मराठी विश्वकोष खंड क्र.७ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७७ पा नं. ६६९

७. कै. हिवरगावकर ब.रा. कौटिलीय अर्थशास्त्र वरदा प्रकाशन, पुणे १९९९
८. फडके य.दि. राजकीय दहशतवाद अक्षर प्रकाशन, मुंबई-२०००
९. मातापुरकर मो.गो.,दहशतवादाच्या भडकत्या ज्वाला, कालिंदी प्रकाशन, पुणे-१९९९
१०. पाध्ये यशवंत, जागतिक पातळीवर हैदोस घालणारा -दहशतवाद, मनोरमा प्रकाशन मुंबई
११. खरे गो.ना. ,ईशान्य भारत, अज्ञात उपेक्षित, सदाशिव बागाईतदार स्मृतीमाला, पुणे-२०००